# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## वैद्यकीय मुख्य कार्यालय – धन्वंतरी कक्ष
## सभावृत्तांत

दिनांक – ०६/०६/२०२३ वेळ – दु.१२.०० वा.

**विषय – धन्वंतरी स्वास्थ्य योजना समितीकडील विविध प्रलंबित विषयांचे अनुषंगाने बैठकीचा सभावृत्तांत..**

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण - २०१३ नुसार समितीकडील विविध प्रलंबित विषयांवर चर्चा करणेकामी मंगळवार, दि. ०६ जून, २०२३ रोजी दु.१२.०० वा. मा.आयुक्त सो. यांच्या अध्यक्षतेखाली मा.आयुक्त यांचे दालनात बैठक आयोजित केली होती. सदरचे बैठकीस खालील समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

| अ.क. | अधिकारी नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.शेखर सिंह | आयुक्त तथा अध्यक्ष |
| २ | श्री.जितेंद्र वाघ | अतिरिक्त आयुक्त तथा उपाध्यक्ष |
| ३ | श्री.बबन झिंजुर्डे | अध्यक्ष पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघ तथा उपाध्यक्ष. |
| ४ | श्री.प्रमोद भोसले | मुख्य लेखापरिक्षक तथा सदस्य |
| ५ | श्री.जितेंद्र कोळंबे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा खजिनदार |
| ६ | श्री.विठ्ठल जोशी | उपआयुक्त, सामान्य प्रशासन तथा सदस्य |
| ७ | डॉ.लक्ष्मण गोफणे | आरोग्य वैद्यकीय अधिकारी तथा कार्याध्यक्ष |
| ८ | डॉ.अभयचंद्र दादेवार | अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी |
| ९ | श्री. प्रमोद जगताप. | कामगार कल्याण अधिकारी तथा सदस्य |
| १० | श्री.नितीन समगीर | सह खजिनदार |
| ११ | श्री.मनोज माछरे | सह खजिनदार |

समिती पुढील मुद्यांवर खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली –

| विषय क्र. | विषय | निर्णय | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १ | कर्मचा-यांसाठी धन्वंतरी स्वास्थ्य योजना बंद करणे व त्याऐवजी वीमा योजना सुरू करणे याबाबत मे.न्यायालयात दावा दाखल आहे. त्यावर चर्चा करणे. | सदर विषयावार सविस्तर चर्चा करुन खालील प्रमाणे निर्णय घेणेत आले – विमा योजना कार्यान्वित करणेबाबत प्रथमत: वैद्यकीय विभागामार्फत मा.अतिरिक्त आयुक्त यांनी मे.दि न्यु इंडिया एश्योरन्स कं.लि. व मे.के.एम.दस्तुर रिइन्श्युरन्स ब्रोकर प्रा.लि. तसेच अध्यक्ष, कर्मचारी महासंघ व इतर यांचे समवेत बैठक आयोजित करावी. सदर बैठकीनंतर महासंघाने उपस्थित केलेल्या मुद्याबाबत योग्य ती कार्यवाही करुन औद्योगिक न्यायालयातील दावा मागे घेण्याबाबत महासंघ कार्यवाही करील. | धन्वंतरी विभाग |
| २ | श्रीम,मंजना मुदाम भोसले यांची मोठी मुलगी मंजूषा मुदाम भोसले वय वर्षे २६ अविवाहीत असून सर्वस्वी माझ्यावर अवलंबून असून, तिला मेंदू विकार असल्याने त्यासाठी वैद्यकिय उपचारार्थ होणारा सर्व खर्च मला करावा लागत आहे. विशेष बाब म्हणून धन्वंतरी योजनेमार्फत तिच्यावर उपचार करणेत यावेत. | धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण – २०१३ अन्वये आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन श्रीम.मंजना मुदाम भोसले यांचे मुलीस उपचार करणेस परवानगी देणेत येत आहे. | धन्वंतरी विभाग |
| ३ | मा.कर्मचारी महासंघ यांच्या मागणीनुसार सेवानिवृत्त होताना कर्मचा-यास त्वरीत धन्वंतरी स्वास्थ्य योजनेचा लाभ मिळणेबाबत. | मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी १. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्त झालेनंतर पीपीओ आदेश वेळेत न झालेने अपवादात्मक परिस्थितीत | लेखा विभाग |

| विषय क्र. | विषय | निर्णय | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| | | परिस्थितीत वैद्यकीय उपचारांकामी अडथळा निर्माण होत असलेने याबाबत धोरण तयार करुन लेखा विभागामार्फत परिपत्रक निर्गत करणेत यावे.<br>२. शासनाकडील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी / कर्मचारी यांना धन्वंतरी स्वास्थ्य योजना लागू असून इतरांप्रमाणे त्यांची देखील सरसकट सभासद वर्गणी कपात करणेत यावी. तसेच ज्यांना धन्वंतरी स्वास्थ्य योजना नको असले त्यांचे हमीपत्र घेणेत यावे.<br>३.मनपातील अंशदान पेन्शन योजना लागू असलेले सेवानिवृत्त/मयत अधिकारी/कर्मचारी यांना सभासद वर्गणी कपातीबाबत धोरण तयार करावे.<br>सदर प्रकरणी लेखा विभागामार्फत धोरण तयार करुन परिपत्रक निर्गत करावे. | |
| ४ | श्री.दत्तात्रय बारकू भोर सेवानिवृत्त सुरक्षा सुपरवायझर त्यांचे किडणीला इन्फेक्शन असल्याने त्यावर होणारा औषधोपचाराचा खर्च दरमहा र.रु.४०,०००/- ते र.रु.४५,०००/- इतका असल्याने, व पेन्शन र.रु.१८,५००/- आहे. औषधोपचाराचा खर्च मोठा असल्याने वाय सी एम मधून औषधे उपलब्ध करून मिळावीत | शासनाकडील मंजूर दुर्धर आजारांवरील औषधोपरांची बिले मंजूर करणेकामी मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण रुग्णालय, संबंधित विभागप्रमुख व वैद्यकीय अधिकारी धन्वंतरी कक्ष यांची तांत्रिक समिती स्थापन करणेत यावी. व समितीमार्फत बिले अदायगीबाबत निर्णय घेणेत यावा. | धन्वंतरी विभाग |
| ५ | डॉ.सुजाता नितीन गायकवाड, स्त्रीरोग तज्ञ भोसरी रुग्णालय यांचा मुलगा सिध्दांत वय २७ वर्षे यास वयाच्या १२ व्या वर्षी गंभीर अपघात झाल्याने त्यास शारीरीक व मानसिक अपंगत्व आलेले आहे. त्यास धन्वंतरी योजने अंतर्गत उपचार मिळणेकामी धन्वंतरी योजनेमध्ये त्याचे नावाचा समावेश करणेबाबत | धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण – २०१३ अन्वये आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पुर्तता करुन डॉ.सुजाता नितीन गायकवाड यांचे मुलास उपचार करणेस परवानगी देणेत येत आहे. | धन्वंतरी विभाग |
| ६ | शिक्षण मंडळातील प्राथमिक शिक्षक यांना धन्वंतरी योजनेत समाविष्ट करुन त्यांची वर्गणी र.रू.३००/- असणे आवश्यक आहे. व सेवानिवृत्त शिक्षक यांना धन्वंतरी आरोग्य योजना सुरू करणेबाबत | शिक्षण मंडळातील प्राथमिक शिक्षक यांना नव्याने प्रस्तावित करणेत येणा-या विमा योजनेमध्ये समाविष्ट करणे शक्य होईल व त्यांस मनपाचे इतर अधिकारी/कर्मचारी यांप्रमाणे सभासद वर्गणी आकारणेत यावी. | धन्वंतरी विभाग |
| ७ | मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित झालेले विषय. | | |
| i | धन्वंतरी स्वास्थ्य धोरणानुसार विमा योजनेमध्ये खर्च मर्यादा र.रु.20 लाख ऐवजी र.रु.1 कोटी (प्रति कुटूंब/प्रती वर्ष) पर्यंत कराणे बाबत अध्यक्ष, कर्मचारी महासंघ यांनी मुद्या उपस्थित केला. | सदर बाबत सविस्तर चर्चा करणेत आली व खालील प्रमाणे निर्णय देणेत आला.<br>-र.रु.3 लाख ते र.रु.5 लाख पर्यंतचे खर्च मंजूरीचे अधिकार मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना राहतील.<br>-र.रु.5 लाख ते र.रु.10 लाख पर्यंतचे खर्च मंजूरीचे अधिकार मा.अतिरिक्त आयुक्त यांना राहतील.<br>-र.रु.10 लाख ते र.रु.20 लाख पर्यंतचे खर्च मंजूरीचे अधिकार मा.आयुक्त यांना | धन्वंतरी विभाग |

| विषय क्र. | विषय | निर्णय | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| | | राहतील.<br>-र.रु.20 लाखाचे वरील सर्व खर्च मंजूरीचे अधिकार धन्वंतरी स्वास्थ्य योजना समितीस राहतील. | |
| ii | दंतोपचाराबाबत | सध्या चालू असलेल्या धन्वंतरी स्वास्थ्य योजनेमधे दंतोपचाराची सुविधा उपलब्ध नाही, तसेच मनपाचे रुग्णालयांमध्ये दंतोपचाराची सुविधा उपलब्ध असलेने मनपा रुग्णालयात उपचार घेणेत यावेत.<br>तसेच कोणत्याही वैद्यकीय आरोग्य विम्यामध्ये दंतोपचार सुविधा देणेत येत नाही. त्यामुळे सदर उपचाराचा समावेश धन्वंतरी तसेच विमा योजनेमध्ये करता येणार नाही. | धन्वंतरी विभाग |

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

नितीन समगिर
सह खजिनदार

मनोज माछरे
सह खजिनदार

आरोग्य वैद्यकीय अधिकारी

अध्यक्ष
पिंपरी चिंचवड कर्मचारी कर्मचारी महासंघ

कामगार कल्याण अधिकारी

उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग

मुख्य लेखा व वित्त अधिकारी

मुख्य लेखापरिक्षक

अतिरिक्त आयुक्त -२
तथा उपाध्यक्ष

आयुक्त
तथा अध्यक्ष